जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 AUG 2026
तरूण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे सोबत मान्यवर.

# कौशल्याने उज्ज्वल भविष्य निश्चित

**कोल्हापूर :** कौशल्य संपादन केल्यास निश्चित उज्वल भविष्य आहे. साहित्य, संस्कृती, कला व क्रीडा हे घटक उदरनिर्वाहासाठी उपयुक्त आहेत. याकरिता शास्त्रशुध्द माहिती असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी केले. विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयेजित लोककला आणि लोकनृत्य माहिती या दोन दिवशीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रथम सत्रामध्ये राजेश पंचे, सोलापूर यांनी तर द्वितीय सत्रामध्ये संदीप पाटील, मुंबई यांनी मार्गदर्शन केले. तृतीय सत्रामध्ये रामानंद उगले, जालना आणि कल्याण उगले, जालना तर चतुर्थ सत्रामध्ये डॉ. गणेश चंदनशिवे, मुंबई यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे यांनी स्वागत केले. डॉ. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शंतनु पाटील, डॉ .श्रीमती एम. बी. पोतदार आदींसह कोल्हापूर, सांगली, सातारा महाविद्यालयांमधील सांस्कृतिक समन्वयक, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 AUG 2026
सकाळ

# शिक्षणातूनच मिळते यशाची गुरुकिल्ली : डॉ. देशमुख

कोल्हापूर, ता. २३ : 'आजचे युग एआयचे आहे. त्यात यशस्वी व्हायचे असेल, तर कौशल्याधारित शिक्षणाची आवश्यकता आहे. यशाची गुरुकिल्ली शिक्षणातून मिळते,' असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखेचे डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राने ऑनलाईन माजी विद्यार्थी मेळावा घेतला. त्यात 'पदवी व पदव्युत्तरनंतरचे करिअर' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर होत्या. विद्यार्थी हीच संस्थेची ओळख असते. संस्थेतून संस्कृती, मूल्य जतन आणि जडणघडण होते. माजी विद्यार्थी मेळावा हा संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले. माजी विद्यार्थी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे ॲम्बेसेडर आहेत. त्यांनी या केंद्राचे पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचवावेत, असे आवाहन डॉ. पाटणकर यांनी केले.

सचिन भोसले यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. समन्वयक कृष्णा पाटील यांनी स्वागत केले. प्रकाश बेळीकट्टी यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया मोगले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 AUG 2026

लोकमत

# आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे : देशमुख

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आजचे युग कृत्रिम बुद्धिमत्तेचे असून, या युगात यशस्वी होण्यासाठी कौशल्याधारित शिक्षणाची गरज आहे, त्यामुळे यशाची गुरुकिल्ली शिक्षणातून मिळते, असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'पदवी व पदव्युत्तर पदवीनंतरचे करिअर' विषयावरील व्याख्यानात डॉ. देशमुख प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. सचिन भोसले यांनी विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली.